■ वर्ष-०७ ■ अंक-२५ ■ मुंबई, मंगळवार ११ ते १७ मे २०२१ ■ पृष्ठ-४

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ● कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक



PG 2 मुंबईतील युरेनियम प्रकरणाचा तपास 'या' कारणामुळं एनआयएकडे

3 → करोना व्यवस्थापनाचं 'मुंबई मॉडेल' प्रेरणादायी; नीती आयोगाकडून महापालिकेचं कौतुक

वांगणीतील ९९ टक्के फुफ्फुस संसर्ग झालेल्या रुग्णाला दोन दिवसात बरे केल्याचा दावा, डॉक्टरवर गुन्हा दाखल ← 4



www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page


## युरेनियम प्रकरणाचा तपास आता NIA कडे



महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथ (एटीएस) ने जप्त केलेल्या ७ किलो युरेनियम प्रकरणचा तपास आता नॅशनल इनवेस्टीगेशन एजन्सी (NIA) ने हाती घेतला आहे. त्यामुळे या प्रकरणातील यापुढील तपास आता एनआयए करणार हे स्पष्ट झाले आहे. या संपूर्ण प्रकरणात युरेनियमचा संबंध आल्यानेच ...पान २ वर...

## दहावीच्या मूल्यमापनाबाबत संदिग्धता



मुंबई : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (सीबीएसई) अनुकरण करत राज्याच्या शिक्षण विभागाने दहावीच्या परीक्षा रद्द करण्याचा ...पान २ वर...

# माझा डॉक्टर बनून मैदानात उतरा

## खासगी डॉक्टरांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे आवाहन

कोरोना काळात फॅमिली डॉक्टर्सची भूमिका अतिशय महत्वाची आहे. कारण कोणत्याही लहान मोठ्या आजारात रुग्ण पहिल्यांदा आपल्या जवळच्या, परिवाराच्या डॉक्टरशी संपर्क साधतो. त्यामुळे त्यांची जबाबदारी खूप महत्वाची असून सर्वसामान्यांसाठी आपण माझा डॉक्टर बनून मैदानात उतरा, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केले. उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील एका वैशिष्ट्यपूर्ण व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आज राज्य टास्क फोर्समधील तज्ज्ञ डॉक्टर्सनी मुंबईतील सुमारे ७०० खासगी डॉक्टर्सना कोरोनाबाबतीत वैद्यकीय उपचारांबाबत निश्चित कार्यपद्धती अवलंबवावी याविषयी एकाचवेळी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या अनेक



शंकांचे निरसन केले.

केवळ काही डॉक्टर्सशी न बोलता तंत्रज्ञानाचा सुयोग्य उपयोग करून अगदी थेट तळागाळात काम करणाऱ्या शेवटच्या डॉक्टरशी बोलण्याचा आणि त्यांच्याही सूचना ऐकून घेण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या उपक्रमाचे वैद्यकीय क्षेत्रात स्वागत होत आहे. यावेळी बोलताना ठाकरे यांनी डॉक्टरांना कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

घरी उपचारातील रुग्णांकडे लक्ष हवे लक्षणे नसलेले रुग्ण रुग्णालयात जातात आणि आवश्यक नसतानाही त्यांना बेड्स उपलब्ध करून दिले जातात. यामुळे खऱ्या गरजू रुग्णांना सुविधा मिळत नाहीत. त्याचप्रमाणे कोविड रुग्ण उशिराने दवाखान्यात जात असल्याने योग्य उपचारांना उशीर होतो. त्यामुळे फॅमिली डॉक्टर्सनी काळजीपूर्वक तपासणी करताना कोविड लक्षणे ओळखून त्याप्रमाणे तात्काळ उपचार सुरू केल्यास वेळीच रुग्ण बरा होण्यास मदत होईल, असे ठाकरे म्हणाले.

सर्व डॉक्टर्सनी घरी उपचार घेणाऱ्या रुग्णाला प्रोटोकॉलप्रमाणे उपचार मिळताहेत किंवा नाही याकडे व्यक्तिश: लक्ष द्यावे. तसेच वॉर्ड अधिकाऱ्यांना देखील योग्य ती माहिती वेळोवेळी दिल्यास रुग्णांच्या बाबतीत पुढील व्यवस्थापन करणे पालिकेला सोपे जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कोविड उपचार केंद्रांमध्येही सेवा द्या आपल्या परिसरातील कोविड उपचार केंद्र किंवा जम्बो केंद्रांना देखील आपल्या सेवेची गरज आहे ...पान २ वर...

# परमबीर सिंह यांची एसीबीकडून गोपनीय चौकशी

### एसीबीकडे पोलीस निरीक्षक बी. आर. घाडगे आणि एपीआय अनुप डांगे यांनी सिंह यांनी भ्रष्टाचाराची तक्रार परमबीर सिंह यांच्या विरोधात दाखल केली आहे.



मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्या अडचणी काही संपुष्टात येताना दिसत नाहीत. त्यातच अडचणींमध्ये भर घालणारी आणखी एक गोष्ट घडली आहे, ती म्हणजे परमबीर सिंह यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) तीन प्रकरणातील चौकशी सुरू झाली आहे. तीन तक्रारदारांनी परमबीर सिंह यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारीमुळेच ही चौकशी सुरू करण्यात आली आहे. एसीबीमार्फत ही प्राथमिक स्वरूपाची अशी गोपनीय स्वरूपाची चौकशी आहे. या गोपनीय चौकशीत म्हणजे डिस्क्रीट एनक्वायरीमध्ये पुढे गुन्हा दाखलही होण्याची शक्यता आहे. एसीबीकडे पोलीस निरीक्षक बी. आर. घाडगे आणि एपीआय अनुप डांगे यांनी सिंह यांनी भ्रष्टाचाराची तक्रार परमबीर सिंह यांच्या विरोधात दाखल केली आहे. तर क्रिकेट बुकी सोनू जालान यानेही बेकायदेशीररित्या पैसे उकळल्याचा आरोप केला आहे. त्यामुळेच परबीर सिंह यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता. आता या प्रकरणात एसीबीकडून म्हणजेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून तीन प्रकरणाची गोपनीय चौकशी (डिस्क्रीट एनक्वायरी) ...पान २ वर...

# लॉक डाऊन च्या काळात सर्वसामान्यांना कायदेविषयक प्रशिक्षण सोशल राईट्स फाउंडेशनचा उपक्रम

मागील दीड वर्षापासून बरीचशी मंडळी यामध्ये विद्यार्थी, नोकरदार वर्ग, महिलावर्ग, तसेच ज्येष्ठ नागरिक, घरीच असल्यामुळे सततच्या करोना च्या बातम्या व त्यामुळे होणारे भीतीदायक विचार यापासून दूर ठेवण्यासाठी सोशल राईट्स फाऊंडेशनचे संस्थापक दीपक मोरेश्वर नाईक यांनी सर्व समाजातील लहान मोठ्या माणसांसाठी गेले वर्षभर कायदेविषयक प्रशिक्षण व लोकप्रिय भाषण कसे करावे याविषयी मोबाईल मधील झूम व्हिडिओ आपलिकेशन च्या द्वारे घर बसल्या प्रशिक्षण देण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरू केले आहे .यामध्ये आपल्या मातृभाषेत भाषण कसे करावे ?व लोकप्रिय वक्ता कसे बनावे ?याचे प्रशिक्षण संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय असलेले लोकप्रिय वक्ता संजय लाड हे देत आहेत त्याचप्रमाणे कायदेविषय क मार्गदर्शन नामवंत कायदेतज्ञ आकाश थाटे व अंकिता जयस्वाल हे नियमितपणे प्रत्येक मंगळवार व शनिवार दोन तास सदरचे प्रशिक्षण देण्याचे काम करतात. यामुळे सामान्य जनतेवर कायदा कसा हाताळायचा. कायद्याचे उल्लंघन होणार नाही ना. यासाठी घेण्यात येणारी खबरदारी महिलांचे अधिकार कोणते? जागा जमीन व सदनिका घेताना कोणती काळजी घ्यायची? आपले रक्षक पोलीस बंधू यांच्याशी कसे वर्तन ठेवायचे त्यांच्याशी कसे वागायचे ?अशा अनेक विषयावर प्रशिक्षण नियमित सुरू आहे. यामुळे दिवसेंदिवस प्रशिक्षण वर्गामध्ये सामान्य जनतेची मागणी वाढत आहे. या संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन संजय लाड हे करत आहेत. जर कोणाला पुन्हा सुरु होणारे अनेक विषयावरील वर्ग या मध्ये भाग घ्यायचा असेल तर कृपया 8424989898/9594418181 या भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा असे आवाहन सोशल राईट्स फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दीपक मोरेश्वर नाईक यांनी केले आहे. सोशल राइट्स ही संघटना मागील सात वर्षांपासून विविध विभागांमध्ये आपले प्रतिनिधी नेमून अशा प्रकारचे विविध विषय घेऊन कार्यक्रम करत आहेत.

# दिव्यांग व्यक्ती असून वर्क फ्रॉम होम वर न जाता नैतिकता टिकवणारा ठाणे जिल्हा माहिती कार्यालयातील धडाडी असणारे नितीन पाटोळे यांच्या कार्याची सर्वत्र ठाणे जिल्ह्यात प्रशंसा



कोरोना आला, प्रादुर्भाव वाढला,रूग्णांची संख्या वाढली तर कमी झाली,काही आपल्या बांधवांना आपला जीवही गमवावा लागला,अनेक कोरोना योध्दांनी कोरोनावर मातही करण्यासाठी आपली बौध्दीक व शारिरीक ताकद शक्तीपणाला लावली.काही ठिकाणी व्यवसाय ठप्प झाले,गरिबांना आर्थिक परिस्थितीचा सामना हा करावा लागला आहे परंतु प्रशासकीय यंत्रणा व प्रशासकीय क्षेत्रातील सर्व कर्मचारी मात्र,थांबले नाहीत.त्यांनी खबरदारी,जबाबदारीचे पालन करत आपली भूमिका ही निर्भिडपणे साकारली.आजही प्रशासकीय यंत्रणा प्रभावशालीपणे आपले काम करित आहे.अशाच प्रशासकीय सेवेत असणारे ठाणे जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी हे त्याच एकजुटीने कार्य करतांना दिसले आहेत.वेळोवेळी शासकीय योजना असोत,सध्याच्या घडामोडीत लसीकरणासंबंधी परिपुर्ण माहिती अहवाल अवगत करणे,यासारखे अन्य बातम्यांचा आढावा व ठाणे जिल्हयातील पत्रकारांना संबंधित कोरोना जनजागृती माहिती विषयी देणे असे अनेक कार्य मोठया जोमाने करत आहे याच जिल्हा माहिती कार्यालयात नितीन पाटोळे (क्लार्क) यांनी केलेल्या कोरोना प्रादुर्भावात कार्याची प्रशंसा सर्वत्र ठाणे जिल्हयात कौतुकास्पद झाली आहे.त्यांनी कोरोना प्रादुर्भावातही मुख्यता ते दिव्यांग असताना वर्क फ्रॉर्म होम न स्विकारता आपले कार्य निर्भिडपणे केले आहे.स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ठाणे जिल्हयातील पत्रकारांना जाहिरात बिलाचे काम चोखपणे निभावली आहेत.कोरोना प्रादुर्भावात ज्या पत्रकारांची प्रलंबित बिले होती त्या बिलांचा पाठपुरावा वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संवाद,संपर्क,चर्चा करून सर्व पत्रकारांना थकीत बिल मिळवून देण्यास सहकार्य केले.एक प्रकारे माणूसकीची झरी जपली आहे.नितीन पाटोळे हे कोरोनामध्ये कोठेही ढगमगले नसुन निर्भिडपणे आपले काम केल्याने त्यांच्या कार्याची ठाने जिल्हयातील सर्व पत्रकारांनी ...पान २ वर...

# प्रशासन व्यस्त बारमध्ये छम छम बिनधास्त



मीरारोड - कोरोनाने एकीकडे हाहाकार माजवला असताना लॉकडाऊन असून देखील काशीमिरा येथील एका ऑर्केस्ट्रा बार मध्ये चक्क आंबटशौकीन ग्राहकांची मैफिल रंगली . बंदी असून देखील शनिवारी पहाटे बार मध्ये कोरोनाचे नियम झुगारून मानसी बार मध्ये दिलबर ... दिलबर ... ह्या गाण्यावर अश्लील डान्स व नोटांची उधळण सुरू होती . तोच पोलिसांनी धाड टाकून ग्राहक व बार कर्मचारी असे एकूण १९ जणांना अटक करून बारच्या २ मालक - चालकांवर सुद्धा गुन्हा दाखल केला आहे . कोरोनाचा संसर्ग झपाट्याने फैलावत असल्याने शासनाने हॉटेल - बार वर सुद्धा बंदी घातलेली आहे . तसे असताना काशीमीराच्या मीरा गाव नाका येथील मानसी बार मध्ये चक्क नाचगाणी चालत असल्याची माहिती काशीमीराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांना मिळाली. हजारे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र भामरे सह राजेश पानसरे , दिनकर कोल्हे, जयदीप बडे, जयकुमार राठोड, अनिल नागरे, स्वाति देठे असे पथक शनिवारी पहाटे ३ च्या सुमारास मानसी बार वर कारवाईसाठी पाठवले . पथकाने बारच्या मागील दरवाजाने आत प्रवेश केला असता तेथे दिलबर... दिलबर ... ह्या गाण्यावर बारबाला अश्लील नृत्य करत होत्या तर ग्राहक नोटा उडवत होते . पोलिसांच्या पथकास पाहून सर्वांची झिंग उतरली . बारच्या ६ कर्मचाऱ्यांसह १३ ग्राहक अशा १९ जणांना पोलिसांनी अटक केली . तर बार मध्ये सापडलेल्या ६ बारबाला व १ तृतीयपंथी यांची सुटका करण्यात आली . यापैकी ४ बारबालाना तर एका लहानश्या गुप्त खोलीत लपवून ठेवण्यात आले ...पान २ वर...

# आठवड्याभरात 1,203 पोलीस बाधित



विशेष म्हणजे करोना प्रतिबंधक लशींच्या दोन्ही मात्रा घेतलेले अधिकारी, अंमलदार बाधित झाल्याने पोलीस दल चिंतेत आहे.

शुक्र वारी राज्य पोलीस दलातील २० अधिकारी, १६० अंमलदार बाधित झाले. त्यापैकी १८ जणांनी पहिली तर २६ जणांनी दुसरी लस घेतली होती. मुंबईच्या दहिसर पोलीस ठाण्यातील अंमलदार संदीप तावडे यांचा शनिवारी करोनाने मृत्यू झाला. त्यांनी दुसरी लस मार्चमध्ये घेतली होती. मुंबई पोलीस दलात ७५ टक्के मनुष्यबळाने लशीची पहिली मात्र घेतली असून दुसरी मात्र घेतलेल्यांचे प्रमाण सुमारे ५० टक्क्यांवर आहे. राज्य पोलीस दलात आतापर्यंत ४२ हजार १०६ पोलीस बाधित झाले. त्यापैकी ३८ हजार २८६ जणांनी करोनावर मात के ली. ४३२ जणांचा मृत्यू झाला. तर ३ हजार ३८८ जण सध्या उपचार घेत आहेत. उपचार केंद्रे पोलिसांसाठी करोना उपचार केंद्रांची तजवीज के ल्याची माहिती सहपोलीस आयुक्त (प्रशासन) राजकु मार व्हटकर यांनी दिली.

# दोढीडा पेट्रोल पंपावर दंडात्मक कारवाई



गेल्या काही दिवसांपासून मिरा भाईंदर महानगरपालिकेने कोरोना या साथरोगाचा प्रसार आटोक्यात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे.त्या दृष्टीने मा.दिलीप ढोले,आयुक्त यांनी विविध



परिपत्रक प्रसिद्ध करुन नागरिकांना सुचना दिलेल्या आहेत. यात सोशल डिस्टसिंग पाळणे, मास्क चा वापर करणे, विनाकारण रस्त्यावर न फिरणे त्याचप्रमाणे गर्दी होणारी ठिकाणे हलवून गर्दी न होवू देणे म्हणजे भाजीपाला विक्री करीता मोकळ्या मैदानात सोय करणे, अत्यावश्यक सेवा वगळता इतरांना इंधन न देणे अशा प्रकारचे आदेश काढले आहेत.या बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपायुक्त अजित मुठे यांचे नियंत्रणाखाली एकुण सहा प्रभागात मिळून सत्तावन्न पथके सहा वर्ग-२ अधिकाऱ्यांच्या अंतर्गत नेमलेली आहेत.या पथकां मार्फत विना मास्क फिरणारे, मॉर्निंग वॉक,नाईट वॉक करीता घराबाहेर पडणारे,चुकीच्या पध्दतीने मास्क घालणारे,सोशल डिस्टंसिंग न पाळणारे, हॉटेल व दुकाने उघडी ठेवणारे यांच्यावर कारवाई करण्यात येत असून मॉर्निंग वॉक किंवा नाईट वॉक करीता फिरणाऱ्यांची ॲटीजन टेस्ट करण्यात येते. आज पर्यंत यात जवळपास २०० ते ३०० व्यक्तींच्या टेस्ट करण्यात आल्यात. दि.३० एप्रिलपासून आजपर्यंत जवळ- जवळ ₹८०००००/-(आठ लक्ष) एवढी रक्कम दंडात्मक कारवाईत जमा झाली आहे. अत्यावश्यक सेवेतीलच वाहनांना व व्यक्तींनाच ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र
मुंबई

मुंबई, मंगळवार ११ ते १७ मे २०२१

# भाईंदर परिसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री करणारा रामनवल गुप्ता यास पोलिसांनी केली अटक

## आयुक्त परिमंडळ १ यांची उत्कृष्ट कामगिरी

दिनांक ०७.०५.२०२१ रोजी एका दुकानात मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधी तंबाखु,विक्रीकरीता साठवणुक कली असल्याची बातमी, गुप्त बातमीदाराकडून श्रो.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड यांना मिळाली. त्यानुसार पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने दि.०७/०५/२०२१ रोजी शॉप नंबर एस २, गंगा जमुना बिल्डींग, विनायक मंदीर राड, मोदी पटल रोड भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे येथे छापा घातला असता शॉपमध्ये रामनवल रामदेव गुप्ता, बय इट वर्षे रा. फ्लट नंबर बी/१३, बिंदू बिल्डींग ६० फुट रोड, भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाण हा मिळून आला. तसेच सदर शॉपमध्ये त्याच्या ताब्यात असलेला (<.॥९.1000, 1२०९709 गुटखा ब बंदर च्युइंगम सुगंधीत तंबाखु ब रोख रक्कम असा एकुण १,८३,१३० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त कलेला आहे. सदर प्रकरणी बरील इसमाविरुध्द भाईंदर पो.ठाणे गुरनं. । २०८/२०२१ कलम ३२८, २७२, २७३ भादंवि. सह कलम २६(२),(४), ३०(२)(ए), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ प्रमाणे दिनांक ०८.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद केला आहे. सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांच्या मार्गदर्शनाखाली, दत्तुसाहेब लोंढे, सहा.पोलीस निरीक्षक, पोहवा.अजय मांडोळे, पोकॉ.जितंद्र उथळे व पाकॉ.विनाद चव्हाण यांनो केली आहे.

# खिडकीतून चोरला तीन लाखांचा ऐवज




पुणे, लोहगाव परिसरात उघड्या खिडकीतून प्रवेश करून चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा तीन लाख सहा हजार रुपयांचा ऐवज चोरल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ३२ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. लोहगाव येथील प्राइम डायमंड रिजेन्स रो हाउस क्रमांक पाच येथे चार ते पाच मे दरम्यान ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व त्यांची पत्नी येथे राहतात. चार मे रोजी रात्री तक्रारदार व त्यांची पत्नी हॉलमध्ये झोपले होते. त्या वेळी अज्ञात चोरट्याने बेडरूमच्या उघड्या खिडकीतून आत प्रवेश करून, कपाटात ठेवलेले २५ हजार रुपये, सोने व चांदीचे दागिने असा तीन लाख सहा हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिस अधिक तपास करत आहेत. उन्हाळयाच्या दिवसांत दारे-खिडक्या उघडे ठेवून झोपणाऱ्या नागरिकांच्या घरातून चोरी करण्याचा फायदा चोरटे घेताना दिसत आहेत. नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# काही काळापासून भाजपमधील काही नेते ओबीसी नेत्यांना टार्गेट करताहेत, एकनाथ खडसेंचा आरोप



जळगाव : मागील काळात ओबीसी नेत्यांना भाजपा ने नेहमीच सहकार्य केल्याचं पाहायला मिळत होतं. मात्र गेल्या चारपाच वर्षांचा विचार केला तर भाजपचे काही नेते ओबीसी नेत्यांना टार्गेट करीत असल्याचं पाहायला मिळत असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी केला आहे.

यावेळी बोलताना खडसे यांनी म्हटलं आहे की गोपीनाथ मुंडे यांचा छळ करण्यात आला, माझ्यावर बिनबुडाचे आरोप करण्यात आले, बदनाम करण्याचे काम केले, चंद्रकांत बावनकुळे यांना तिकीट नाकारण्यात आले असेल, धनगर समाजाचे अण्णा डांगे, भाऊसाहेब फुंडकर असतील अशी कितीतरी नाव आहेत. यांचा काहींना काही कारणाने छळ करण्यात आला मात्र पार्टी म्हणून तो सहन करण्यात आला होता.

खडसे म्हणाले की, अलीकडे चंद्रकांत पाटील यांनी छगन भुजबळ यांना धमकी दिली की तुम्ही जामिनावर आहात, म्हणजे याचा अर्थ असा की माझ्या विरोधात असो की छगन भुजबळ यांच्या बाबत असो ईडी लावण्याचा प्रकार म्हणजे सर्व षडयंत्र यांचेच आहे हे आता उघड व्हायला लागले आहे. म्हणजे यांच्या विरोधात बोललं, यांच्यासोबत गेले नाही, आमची साथ देणार नसाल तर आम्ही तुमच्या विरोधात ईडी किंवा सीबीआय लावू असा त्याचा अर्थ आहे. मात्र छगन भुजबळ अशा गोष्टींना घाबरतील असे नाही अस खडसे यांनी म्हटलं आहे. ते म्हणाले की, सरकार आले, सरकार गेले मात्र विरोधकांना कारण नसताना ईडी लावावी आणि त्याचा छळ करवा अस कधी घडत नव्हतं. मात्र अलीकडच्या काळात मात्र माझा कोणताही संबंध नसताना केवळ मी पक्ष बदलला म्हणून त्रास देण्यासाठी चौकशा लावण्याचा प्रयत्न केला जात आहेत.पूर्वी ईडी किंवा अन्य गोष्टी जनतेला माहीत नव्हत्या. त्या आता माहीत होऊ लागल्या आहेत. मात्र विरोधकांना दाबून ठेवण्यासाठी जर अशा यंत्रणांचा वापर केला जात असेल तर ते योग्य नसल्याचं ही खडसे यांनी म्हटलं. खडसे म्हणाले की, सध्याची परिस्थिती हालाखीची आहे या परिस्थिती मध्ये कोणीही राजकारण करू नये, अशी भूमिका नितीन गडकरी यांनी मांडली आहे आणि अशाच प्रकारची भूमिका आपण मागच्या महिन्यात मांडली होती. त्यामुळे विरोधक असो वा सत्ताधारी यांनी मतभेद विसरून एकत्र येऊन कोरोनाची लढाई लढली पाहिजे. केवळ टीकाटिप्पणी करून यंत्रणा ही नाउमेद होत असते. त्यामुळे असं होता कामा नये, असं गडकरी यांनी म्हटलं आहे आणि आपण त्यांच्या मताशी सहमत असल्याची प्रतिक्रिया एकनाथरा खडसे यांनी जळगाव येथे दिली.

# मुंबईतील युरेनियम प्रकरणाचा तपास 'या' कारणामुळं एनआयएकडे




मुंबईः अणुबॉम्बसह अन्य स्फोटके बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या युरेनियमचा मोठा साठा मुंबईत हस्तगत करण्यात आला आहे. त्यानंतर एटीएसनं जप्त केलेल्या युरेनियम प्रकरणाचा तपास आता राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए)नं घेतला आहे. महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) बुधवारी मानखुर्द येथून दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे २१ कोटी रुपयांचे सात किलोपेक्षा अधिक घन स्वरूपातील युरेनियम हस्तगत केले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर ज्वालाग्राही आणि तितकेच घातक युरेनियम मुंबईत सापडल्याने खळबळ उडाली होती. एटीएसने जिगर पांड्या आणि अबू ताहीर या दोघांना याप्रकरणात अटक केली होती. बेकायदा स्फोटक प्रकरण असल्याने एनआयएने आपल्या अधिकारातंर्गत हे प्रकरण वर्ग करून घेतले आहे. एटीएसनं कशी केली कारवाई? युरेनियम बाळगण्यास तसेच त्याची विक्री करण्यास कायद्याने बंदी आहे. असे असतानाही एक तरुण घन (रॉड) स्वरूपातील युरेनियमची विक्री करीत असल्याची माहिती एटीएसला मिळाली. एटीएसचे उपमहानिरीक्षक शिवदीप लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपाडा युनिटचे प्रभारी पोलिस निरीक्षक संतोष भालेकर, सहायक निरीक्षक प्रशांत सावंत यांच्या पथकाने युरेनियम विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या ठाणे येथील जिगर पांड्या या तरुणाला ताब्यात घेतले. जिगर याच्याकडे काही प्रमाणात युरेनियम सापडले. हे युरेनियम मानखुर्द, मंडाला येथे राहणाऱ्या अबू ताहीर याने विक्री करण्यासाठी दिल्याचे जिगर याने सांगितले. जिगरने दिलेल्या माहितीवरून एटीएसच्या पथकाने ताहीर याला पकडले. ताहीर याने कुर्ला स्क्रॅप मर्चंट असोसिएशन (मानखुर्द) येथील गाळयामध्ये हे युरेनियम ठेवण्यात आले असून ते भंगारात मिळाल्याचे सांगितले. युरेनियम घातक असून त्यातून किरणोत्सर्ग होण्याची भीती असल्याने एटीएसच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती भाभा अणुशक्ती केंद्राला दिली. येथील तज्ज्ञांनी सुरक्षितरित्या हे युरेनियम ताब्यात घेतले.

# कर रद्दसाठी तीन लाखांची लाच



नागपूर, मालमत्ता कर रद्द करण्यासाठी तीन लाख रुपयांची लाच मागणाऱ्या व स्वीकारणाऱ्या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

महापालिकेच्या कर विभागातील सायबर टेक कंपनीचा सुपरवायझर (कंत्राटी) रवींद्र भाऊराव बागडे (वय ३१, रा. कोराडी मार्ग परिसर) आणि मनपाच्या आशीनगर झोनमधील करसंग्राहक सूरज सुरेंद्र गणवीर (वय ३४, रा. बेझनबाग) अशी या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणातील फिर्यादी हे जरीपटका परिसरातील रहिवासी आहेत. त्यांचे या परिसरात रिसॉर्ट आणि लॉन आहे. या मालमत्तेचा कर सुमारे ७९ लाख इतका निश्चित करण्यात आला होता. गणवीर यांच्या सहीनिशी हा कर निश्चित करण्यात आला होता. या कराबाबत त्यांनी गणवीरला संपर्क साधला. त्याने तो कमी किंवा रद्द करण्यासाठी लाच मागितली. 'अधिकारी बागडे यांच्याशी माझे बोलणे झाले असून ३ लाख रुपयांच्या लाचेच्या बदल्यात हा कर रद्द केला जाईल', असे गणवीरने तक्रारदाराला सांगितले. यावर तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केली. यावर विभागाचे पोलिस उपअधीक्षक शशिकांत पाटील यांनी सापळा रचला. गणवीर तक्रारदारांच्या घरी गेला. तेथे त्याने लाचेची रक्कम स्वीकारताच त्याला एसीबीने पकडले. एसीबीने दोघांवरही गुन्हे दाखल केलेत. ही कारवाई विभागाच्या पोलिस अधीक्षक रश्मी नांदेडकर, अपर पोलिस अधीक्षक तोतरे यांच्या मार्गदर्शनात उपअधीक्षक शशिकांत पाटील, पोलिस निरीक्षक विनोद आडे आणि त्यांच्या चमूने केली.

# ऑलम्पिक पदक विजेता पैलवान सुशील कुमार हत्या प्रकरणात फरार



ऑलिम्पिक पदक विजेता पैलवान सुशील कुमार याच्याविरोधात दिल्ली पोलिसांनी सोमवारी लूकआऊट नोटीस जारी केली आहे. दिल्लीतील मॉडेल टाऊन भागातील छत्रसाल स्टेडियमवर पैलवानांच्या दोन गटांत मंगळवारी हाणामारी झाली होती. यामध्ये पाच पैलवानांना गंभीर दुखापत झाली होती. त्यापैकी सागर नावाच्या २३ वर्षीय पैलवानाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी सुशील कुमारसह पाच जणांविरुद्ध दिल्ली पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. सुशील कुमारशिवाय २० अन्य आरोपींचाही पोलिसांना शोध आहे. दिल्लीच्या छत्रसाल स्टेडियमवर पैलवानांच्या दोन गटात झालेल्या हाणामारीत २३ वर्षीय सागर राणाचा मृत्यू झाला होता. मॉडेल टाऊन परिसरातील फ्लॅट रिकामा करण्यावरुन पैलवानांच्या दोन गटात हाणामारी झाली होती. सागर राणा हत्या प्रकरणात सुशील कुमारचेही नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दिल्ली एनसीआरसोबतच शेजारी राज्यांमध्येही छापेमारी करुन सुशील कुमारचा शोध घेतला जात आहे.मृत पैलवान सागर राणा हा आपल्या मित्रांसोबत छत्रसाल स्टेडियमजवळील मॉडेल टाऊन परिसरातील एका घरात राहत होता. ही जागा रिकामी करण्यावरुन गेल्या मंगळवारी मध्यरात्री दोन गटांमध्ये बेदम हाणामारी आणि गोळीबारही झाल्याचा आरोप आहे. यावेळी सुशील कुमारही उपस्थित असल्याचा दावा पीडितांनी केला आहे. सुशील कुमार म्हणतो...'ते आमचे पैलवान नव्हते, मंगळवारी रात्री उशिरा हा प्रकार घडला. आम्ही पोलीस अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे की, काही अनोळखी व्यक्तींनी आमच्या परिसरात शिरकाव करीत भांडण केले. आमच्या स्टेडियमचा या घटनेशी काही संबंध नाही'.कोण आहे सुशील?

# पृष्ठ १ वरुन

## युरेनियम प्रकरणाचा तपास

आता यापुढील तपास एनआयए करणार आहे. एटीएसने काही दिवसांपूर्वीच गोवंडी भागातून स्क्रॅपमधून मोठ्या प्रमाणात युरेनियम जप्त केले होते. एटीएसने जप्त केलेल्या युरेनियमची किंमत २१ कोटी ३० लाख इतकी आहे. एटीएसने जिगर पांड्या आणि अबू ताहीर यांना आधीच अटक केली आहे. शासनाने प्रतिबंधित पदार्थ म्हणून निर्देशित केलेले नैसर्गिक युरेनियम बाळगल्या प्रकरणी या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने या दोघांनाही १२ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

कसा रचला सापळा ? जिगर पांड्या आणि अबु ताहीर अफझल चौधरी हे दोघेही गेल्या वर्षभरापासून युरेनियमसाठी ग्राहक शोधत होते. याचा वापर कोणकोणत्या क्षेत्रात होतो हेदेखील दोघांनी गुगलवर शोधून काढले होते. त्यामुळे आपल्याकडे असलेल्या ७ किलो युरेनियम विकण्यासाठी ग्राहकाचा शोध यांनी सुरू केला. पण दरम्यानच्या कालावधीत या संशयास्पद गोष्टीची माहिती ही एटीएसच्या अधिकाऱ्यांना लागली. त्यानुसार एटीएसचे पोलिस निरीक्षक संतोष भालेकर यांच्या नेतृत्वातील टीमने या प्रकरणाचा सापळा लावला. ग्राहक म्हणून खुद्द संतोष भालेकर हेच युरेनियम खरेदीसाठी गेले होते. त्यामुळेच या संपुर्ण प्रकरणाचा पर्दाफाश झाला. त्यानंतर चौकशीमध्ये युरेनियम हे गोवंडीच्या मंडाला परिसरात ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात ७ किलो १०० ग्रॅमचे युरेनियम ताब्यात घेण्यात आले आहे.

## माझा डॉक्टर बनून मैदानात उतरा

हे लक्षात ठेवून खासगी डॉक्टर्सनी तिथेही आपली नावे नोंदवावी, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले. टास्क फोर्सने केले शंकांचे निरसन यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित तसेच डॉ. तात्याराव लहाने यांनी कोविड काळातल्या उपचार पद्धतीवर डॉक्टर्सना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले. कोरोनाची लक्षणे फसवी असतात. त्यामुळे येणारा प्रत्येक रुग्ण हा कोरोनाचा तर नसेल ना हा प्रश्न आपल्या मनात उपस्थित ठेवून त्याची तपासणी डॉक्टर्सनी करणे गरजेचे आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

## परमबीर सिंह यांची

सुरू असल्याची सूत्रांची माहिती आहे. ही प्राथमिक स्वरूपाची चौकशी असते जी तीन महिन्यांच्या कालावधीत पार पडते. त्यानंतर जे पुरावे प्राथमिक चौकशीत मिळतात त्यानुसार खुली चौकशी किंवा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया ठरते. सध्या तरी या तीनही प्रकरणामध्ये गोपनीय चौकशीला सुरुवात झाली असून लवकरच संबंधित तक्रारदारांना जबाबासाठी समन्स पाठवण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

पोलीस निरीक्षक बी. आर. घाडगे यांनी परमबीर यांच्यावर करोडो रुपयांचे भ्रष्टाचार केल्याचे आरोप केले आहेत. शिवाय अनुप डांगे यांनीही सिंग यांच्यावर भ्रष्टाचार केल्याचे आरोप केलेत.

## दहावीच्या मूल्यमापनाबाबत

निर्णय घाईने जाहीर केला. मात्र, पंधरा दिवस झाले तरीही अद्याप विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करावे याबाबत शिक्षण विभाग निष्कर्षाप्रत पोहोचलेला नाही. त्यामुळे अकरावीसह विविध अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष यंदाही रखडण्याची शक्यता आहे. 'सीबीएसई'ने परीक्षा रद्द करण्याचे जाहीर केल्यानंतर पालकांच्या मागणीपुढे नमते घेत राज्याच्या शिक्षण विभागानेही राज्यमंडळाच्या दहावीच्या परीक्षा रद्द केल्या. 'सीबीएसई'ने त्यांच्या मूल्यमापनाचे सूत्र जाहीर करून त्याची शाळांनी अंमलबजावणीही सुरू केली. राज्यात मात्र, निर्णय जाहीर करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन कसे करणार याबाबत विचार करण्यात आला नाही. आता निर्णय जाहीर होऊन पंधरा दिवस झाले तरीही शिक्षण विभाग अद्याप विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि पुढील प्रवेश प्रक्रिया कशी करावी याचा निर्णय जाहीर करू शकलेला नाही. परीक्षा रद्द केल्यानंतर मूल्यमापन कसे करावे याबाबतच्या उपायांची चाचपणी करणारा अद्यापही निष्कर्षाप्रत पोहोचलेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ वाढलेलाच आहे. परंतु पुढील शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक यंदाही कोलमडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रवेश परीक्षेचा पेच अकरावीचे प्रवेश हे शालेय शिक्षण विभागाच्या आखत्यारितच होत असले तरी त्याशिवाय अभियांत्रिकी पदविका (पॉलिटेक्निक), तंत्रनिकेतन (आयटीआय) यांची प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण, कौशल्य विकास विभागांच्या आखत्यारित होते. या दोन्ही अभ्यासक्रमांना मिळून जवळपास साडेतीन ते चार लाख विद्यार्थी प्रवेश घेतात.

## दिव्यांग व्यक्ती असून वर्क फ्रॉम

कौतुकाची प्रशंसा केली आहे. वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशाचे पालन करून आपली जबाबदारी सांभाळली असताना दुसरीकडे ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात आलेल्या व्यक्तींना आदरपूर्वक सन्मान देऊन नितीन पाटोळे यांनी माणूसकी व नैतिकता जपली आहे.एकनिष्ठेने काम करून श्री.पाटोळे यांनी प्रशासकीय सेवेतून शासनावर विश्वास ठेवण्याचे प्रत्येकाला संपादन करून देण्याचा सिंहाचा वाटा प्राप्त केला आहे.गेल्या 5 ते 6 वर्षात जे जे जिल्हा माहिती अधिकारी यांनी पदभार स्विकारला त्यांनीही नितीन पाटोळे यांच्या कार्याला पाहून प्रशंसा केली असणारच यात मात्र,शंका नाही.अनेक वर्षापासून ठाणे जिल्हयातील पत्रकारांना थकीत बिल,चालू बिल मिळवून देण्यासाठी नितीन पाटोळे यांनी महत्वपूर्ण भूमिका साकारली आहे.श्री.पाटोळे यांनी नियोजनबध्द काम करून रितसर बिलाची मांडणी करून वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करून अनेक वृत्तपत्रांना त्यांची बिलं प्राप्तीसाठी मदतनीय म्हणून राहिले आहेत.कौटूंबिक विचार बाजूला सारून काम एके काम जोपासणाऱ्या नितीन पाटोळे यांची प्रशंसेचा वर्षाव करण्यात येत आहे.वेळोवेळी जाहिरात संदर्भातील माहिती पत्रकारांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री.पाटोळे यांच्या नावाची चर्चा प्रथम केली जात आहे.त्यामुळे नितीन पाटोळे हे निर्भिड व परखड बूमिकेचे जरी असले तरी त्यांचे कार्य माणूसकी जोडणारी ठरत आहे. श्री.पाटोळे हे दिव्यांग व्यक्ती असताना कोरोना प्रादुर्भावात मोठया धाडसाने कार्यालयात हजर राहून आपले काम करतांना दिसत आहेत.अलीकडे दिव्यांग व्यक्तींना कोरोना प्रादुर्भाव असल्याने वर्क फ्रॉम होम असताना ठाणे जिल्हयाच्या विविध दैनिक,साप्ताहिक,मासिक वृत्तपत्राला माहिती,बिले प्राप्त करून देण्यासाठी या कोरोना प्रादुर्भावातही नितीन पाटोळे हे ठाणे जिल्हा माहिती कार्यालयात निढ़रपणे काम करत असल्याचे निदर्शनास आले त्यांच्या या कार्याचा खरं तर गौरव व्हायला हवं कारण दिव्यांगात जरी असले तरी अनेकांच्या सेवेसी असताना वर्क फ्रॉम होम म्हणून बाजू न स्विकारता कार्यालयातच दररोज येऊन काम करण्याचा त्यांचा नैतिकता टिकवणारा मानस अनेकांना भावून गेला आहे.

## प्रशासन व्यस्त बारमध्ये

होते . पोलिसांनी अटक १९ जणांसह बारचा मालक रवी शेट्टी आणि श्याम कोरडे अश्या एकूण २१ जणां विरुद्ध विविध कलमां खाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे . अटक बार कर्मचारीत विशाल पाठक, तिमआप्पा जोगी उर्फ महेशअण्णा, गोपाल गौडा, श्रीनिवास गौडा, रितेश सोनी, डाबोर सियाल यांचा समावेश आहे . तर अटक केलेले आंबटशौकीन ग्राहक हे मुंबईच्या विलेपार्ले , कांदिवली , अंधेरी , माटुंगा , एल्फिस्टन तसेच ठाणे भागातील राहणारे आहेत. आशिष जोशी, शैलेश झगडे, सुभाष झा, चिराग शाह, मयूर दाभोळकर, परेश मुजिंदरा, मौलिक शाह, जिग्नेश शाह, देविशंकर यादव, प्रकाश गनावत, रुपेश राठोड, भावेश पारेख, राजेश घारे अशी अटक ग्राहकांची नावे आहेत . बार मधून १ लाख ९१ हजारांची रोकड , दारूच्या बाटल्या आणि यंत्र साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे . बंदी असून देखील कोरोना संसर्ग पसरेल याची तमा न बाळगता डान्स बार चालवला जात असल्याच्या प्रकाराने खळबळ उडाली आहे . या प्रकरणी बारवाल्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे .

## दोढीडा पेट्रोल पंपावर दंडात्मक कारवाई

इंधन पुरविण्याचे आदेश असतांना ही आज प्रभाग सहा मधील दोढीडा पेट्रोल पंपावर अत्यावश्यक सेवेतील वाहने व व्यक्तिंव्यतिरिक्त अन्य जणांनाही पेट्रोल/डिझेल देण्यात येत होते.प्रभाग सहाचे प्रभाग अधिकारी स्वप्निल सावंत,पथक प्रमुख भोपतराव व त्यांचे सहकारी ,फेरीवाला पथक प्रमुख व पोलीस कर्मचारी यांनी सदर पेट्रोल पंप धारकावर दंडात्मक कारवाई केली.यावेळी पंपचालकाने पथकाशी वाद घालून गोंधळ केला व राजकीय व्यक्तींच्या माध्यमातून पथकावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला.याबाबत पथक प्रमुखांनी ही बाब उपायुक्त अजित मुठे यांच्या निदर्शनास आणून दिली असता उपायुक्त मुठे यांनी पेट्रोल पंपावर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले, त्यानुसार पेट्रोल पंप धारकाकडून ₹२५०००/- दंड वसूल करण्यात आला. या आठवड्यातच पेट्रोल पंप चालकांवर झालेली ही दुसरी कारवाई आहे.यामुळे पेट्रोल पंप चालकांचे धाबे दणाणले आहे.



संपादकीय...

## फेसबुक, किशोरवयीन मुलं, मद्य आणि डेटिंग

सोशल मीडिया आज आपला जीव की प्राण झालेला आहे. त्याशिवाय अगदी एक मिनिटही आपलं पान हलत नाही. तरुणांचं तर जणू आयुष्यच त्यावर अवलंबून आहे. गप्पा, दोस्ती, प्रेम, ब्रेकअप.. सारं काही सोशल मीडियाच्या माध्यमातून. पण आपण इंटरनेटवर जे काही करत असतो, जे काही पाहतो, लिहितो, ऐकतो, बोलतो... त्या प्रत्येक गोष्टीच्या पाऊलखुणा तिथे उमटत असतात. नेटवर, गुगलवर आपण काय सर्च करतो, फेसबुकवर कोणाला लाइक करतो, आपण काय फॉलो करतो, आपला कल कुणीकडे आहे, आपण कोणत्या गोष्टी सोशल मीडियावर पाहतो, खरेदीसाठी कोणत्या गोष्टी आपण नेटवर शोधतो, कुठली वेबसाइट किती वेळ पाहतो, या प्रत्येक गोष्टीची अगदी बारीकसारीक नोंद होत असते. पुढच्या वेळी त्या आणि तशाच प्रकारच्या जाहिराती आपल्यासमोर झळकतात, त्यांचा आपल्यापुढे आपोआप मारा व्हायला लागतो... नेट, सोशल मीडिया चालू असताना एखाद्या वस्तूबद्दल आपण बोललो, तर त्याच वस्तूच्या जाहिराती आपल्याला लगेच नेटवर दिसायला लागतात, हा अनुभवही अनेकांनी घेतला असेल. फेसबुकच्या संदर्भात आजवर अनेक गोष्टींची जगभरात चर्चा झाली. त्यांच्या बाजारुपणावर टीका झाली. पण फेसबुक आता पुन्हा नव्यानं चर्चेत आलं आहे, ते त्यावर दाखवल्या जाणाऱ्या जाहिरातींवरून. ऑस्ट्रेलियात त्यावरून रणकंदन माजलं आहे. फेसबुकपासून सर्वच सोशल मीडियावाले आम्ही लोकांचा, यूझर्सचा कोणताच डेटा शेअर करीत नाही, वापरत नाही असं कितीही म्हणत असले तरी हा डेटा लीक झाल्याची आणि त्याचा गैरवापर झाल्याची असंख्य उदाहरणं आहेत. अमेरिकेत पहिल्या वेळी ट्रम्प निवडून आले, तेव्हा त्यात सोशल मीडियाचा किती हातभार होता, लोकांचं जनमानस कसं बदलण्यात आलं होतं, हे आता जगजाहीर झालं आहे. ‘ग्लोबल सायन्स रिसर्च’ या संस्थेनं अवैध मार्गानं जवळपास पावणेसहा लाख भारतीय फेसबुक यूझर्सचा डेटा हस्तगत करून तो ‘केंब्रिज ॲनालिटिक’ला विकला होता, या डेटाचा वापर निवडणुकीत भारतीय मतदारांना प्रभावित करण्यासाठी करण्यात आला, असा आरोप आहे. त्यानंतरही ५४ कोटी यूझर्सचा डेटा लीक झाला होता, त्यात ६१ लाख भारतीय होते. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, यासारखी सोशल मीडिया ॲप कशी चालतात? त्यासाठी बहुतांश यूझर्सकडून ते एक पैसाही घेत नाहीत, मग त्यांचा एवढा प्रचंड कारभार चालतो तरी कसा? या कंपन्यांचा आर्थिक व्यवहार जगातल्या अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षाही मोठा आहे. तो चालतो, मुख्यत: दोन घटकांवर. एक म्हणजे हा डेटा ‘चोरीछुपे’ विकणे आणि सोशल मीडियावर केलेल्या जाहिराती.जाहिराती हा सोशल मीडियाच्या उत्पन्नाचा खूप मोठा स्त्रोत आहे. जगामध्ये भारतात सर्वाधिक फेसबुक यूजर्स आहेत. फेसबुकची जाहिरात नीती काहीही सांगत असली तरी यावेळी ऑस्ट्रेलियात त्यांच्या निशाण्यावर आहेत, ती १३ ते १७ वर्षीय किशोरवयीन मुलं. केवळ तीन डॉलरच्या (सुमारे २२५ रुपये) मोबदल्यात त्यांनी दारू, धूम्रपान, त्वरित वजन घटवणे, ऑनलाइन डेटिंग यासारख्या जाहिराती किशोरवयीन मुलांनाही दाखवण्यासाठी मंजुरी दिली आहे. अर्थात, ही गोष्टही उघडपणे नाही, तर चोरीछुपे. ऑस्ट्रेलियाच्या ‘ग्रुप रिसेट’ने आपल्या अहवालात नुकताच यासंदर्भात खुलासा केला आहे. फेसबुक यासंदर्भात सरळ, थेटपणे जाहिरात देत नाही; पण मुलांपर्यंत या जाहिराती कशा पोहोचतील याची व्यवस्था मात्र फेसबुक करतं. दारू, सिगारेट, ऑनलाइन डेटिंग यासंदर्भातल्या बऱ्याच कंपन्यांनी आता किशोरवयीन मुलांना टार्गेट करणं सुरू केलं आहे. त्यांना रसद पुरवण्याचं काम फेसबुक करीत आहे. ‘ग्रुप रिसेट’ने ‘ओजी न्यूज नेटवर्क’ या नावानं फेसबुक पेज तयार करून त्याद्वारे ही पडताळणी केली. त्यावेळी हे सत्य समोर आलं. फेसबुक आपली जाहीरात नीती कितीही साफ असल्याचा दावा करीत असलं तरी त्यांची लबाडी उघडकीस आल्यानं जगभरातून त्यांच्यावर टीका होत आहे. एवढंच नाही, १३ ते १७ वर्षे वयाच्या साडेसात लाख किशोरवयीन मुलांपर्यंत या जाहिराती पोहोचविण्याचा आणि त्याद्वारे गल्ला वसूल करण्याचा प्रस्तावही फेसबुकने या कंपन्यांना दिल्याचं समोर आलं आहे. फेसबुक इथेच थांबलेलं नाही. ज्या जाहिराती केवळ १८ वर्षे आणि त्यापुढील वयाच्या व्यक्तींनाच दिसल्या पाहिजेत अशा ‘ॲडल्ट’ जाहिरातीही फेसबुकच्या माध्यमातून अगदी सहजपणे किशोरवयीन मुलांपर्यंत पोहोचत आहेत. फेसबुक अशी मनमानी करू शकतं, याचं कारण त्यांच्याकडे असलेला प्रचंड पैसा. जगातल्या १५० देशांपेक्षा ही एकटी कंपनी अधिक श्रीमंत आहे. फेसबुकचा मनमानीपणा!फेसबुकच्या या जाहीरात नीतीविरुद्ध ऑस्ट्रेलियन सरकारनंही कडक पावलं उचलली आहेत, शिवाय अलीकडेच त्यांनी एक नवा कायदाही केला आहे. ज्या बातम्या फेसबुकनं आपल्या साइटवर दाखवल्या, त्याचा मोबदला मुद्रित माध्यमांना देण्यासाठी त्यांनी फेसबुकला बाध्य केलं. त्यामुळे चिडलेल्या फेसबुकनं कोरोना लस घेण्याबाबत लो◌ेकांना आवाहन करणारी सरकारी जाहिरातही आपल्या वेबसाइटवर दाखवली नाही.

# तिची वाट अडवणारे...

## केरळ, पश्चिम बंगाल, तमिळनाडू ही तुलनेने प्रगत राज्ये; पण तिथेही महिलांचे विधानसभेत प्रतिनिधित्व कमीच, असे यंदाही का दिसले?

देशाच्या राजकारणात महिलांचे स्थान अद्यापही जेमतेमच राहिलेले आहे, हे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमधून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या देशातील समाजकारण पुरुषसत्ताक होतेच, पण महिलांनाही समाजात प्रतिष्ठा मिळावी यासाठी आजवर जे अनेक प्रयत्न झाले, त्याचा राजकारणावर मात्र फारच थोडा परिणाम दिसतो. राजकारण हे पुरुषसत्ताक आणि पुरुषीच असायला हवे, असे वाटून घेण्याची एक रीत या देशात रूढ झाली आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरण, महिलांचे कल्याण, त्यांचे हक्क आणि त्यांचे निर्णय प्रक्रियेतील स्थान या सगळ्या बाबी केवळ कागदी राहतात आणि त्यामुळेच त्याकडे केवळ करुणेने पाहिले जाते. ज्या पाच विधानसभा निवडणुकांचे निकाल नुकतेच लागले, तेथेही हे पुरुषी राजकारणच दिसून आले.

महिला मुख्यमंत्री असलेल्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीतही तृणमूल काँग्रेस पक्षाने एकूण २९४ जागांपैकी ४० जागांवर महिलांना उमेदवारी दिली, तर भाजपने १९. या ५९ पैकी ४० जणींचा विजय झाला. यावरून ‘निवडून येण्याची क्षमता’ या निकषाला किती महत्त्व मिळते, हे सहजपणे लक्षात येऊ शकते. आसामात यंदा केवळ सहाच महिला आमदार निवडून आल्या आणि तमिळनाडूमध्ये १७. ही परिस्थिती देशातील समाजकारणाची अवस्था दर्शवते. या निवडणुकांमध्ये अधिक प्रमाणात महिलांना उमेदवारी देण्यात कुणालाच रस नसल्याचे दिसले, ते केवळ पुरुषांच्याच वर्चस्वामुळे. मतदार म्हणून महिलांचे स्थान कितीही महत्त्वाचे असले, तरीही पदांची- सत्तेची संधी मात्र पुरुषांना अशी ही स्थिती आहे. त्यामुळे करोनासारख्या बिकट संकटात सर्वाधिक नोकऱ्या महिलांच्याच जातात आणि वैद्यकीय सुविधांबाबतही त्यांच्याकडेच दुर्लक्ष होते. ऐन निवडणुकीपूर्वी घरात राहून संसार सांभाळणाऱ्या महिलांना दर महिन्याला काही रक्कम देण्याची घोषणा होते तीही केवळ मतांसाठी; पण २००८ मध्ये मांडण्यात आलेल्या आणि राज्यसभेने २०१० मध्ये संमत केलेल्या महिला आरक्षण विधेयकावर आज तेरा वर्षांनंतरही लोकसभेत मतदान होऊ शकत नाही! घटनेतील १०८व्या दुरुस्तीचे हे विधेयक लोकसभेत महिलांना एकतृतीयांश जागांएवढ्या प्रतिनिधित्वाची हमी देणारे आहे. अनेक राज्यांत ग्रामपंचायतीपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या या देशात सर्वोच्च सभागृहात मात्र त्यावर साधे मतदानही होत नाही. एवढेच नव्हे, तर या आरक्षणाविरोधातही जाहीरपणे मत व्यक्त केले जाते, ही या देशातील महिलावर्गाची शोकांतिका.




जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांत स्वकर्तृत्वाने अग्रभागी पोहोचलेल्या महिलांना निर्णय प्रक्रियेतूनच वगळण्याची ही खेळी नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीतही दिसून आली. चारही राज्यांतील एकूण जागांपैकी निवडून आलेल्या महिला उमेदवारांची संख्या सत्तरहून थोडी अधिक आहे, तर निवडून आलेल्या पुरुष आमदारांची संख्या ७५२ एवढी. केरळसारख्या ‘देशातील सर्वाधिक सुशिक्षित’ राज्यातही गेल्या ६५ वर्षांच्या राजकारणात, विधानसभेत महिलांना दहा टक्क्यांहून अधिक जागा कधीच मिळाल्या नाहीत. १९९६ मध्ये तेथे सर्वाधिक म्हणजे १३ महिला आमदार निवडून आल्या. २००१ नंतर केरळमधील राजकीय पक्षांनी महिलांना अधिक जागा दिल्या. मागील निवडणुकीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने एकूण जागांपैकी १६ टक्के, तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १४ टक्के आणि भाजप तसेच काँग्रेसने दहा टक्के जागांवर महिलांना उमेदवारी दिली. या चार राज्यांमध्ये दर दहा उमेदवारांमागे एका महिलेची वर्णी लागली. महिलांच्या हिताच्या योजना आखणे आणि प्रत्यक्ष निर्णयात, धोरणांच्या आखणीत त्यांना सामावून घेणे यांत किती अंतर आहे, हे यावरून कळू शकेल.

महिलांना राजकारणात प्रवेश करण्यास विरोध असतो, तो कुटुंबाचा. ही कुटुंब व्यवस्था आजही पुरुषांच्याच हाती असल्याने, घरातील महिलांनी बाहेरच्या जगात जाऊन आपले कर्तृत्व केवळ अर्थार्जनापुरतेच गाजवावे, अशी कुटुंबाची अपेक्षा असते. नोकरी करावी, पैसे मिळवावेत- मात्र घराकडे दुर्लक्ष करू नये- अशा ‘माफक’ अपेक्षांच्या ओझ्याखाली महिलांची घुसमट होत राहते. त्यातून कसाबसा मार्ग काढत ज्या महिला राजकारणात स्वत:चे स्थान मिळवण्याचा प्रयत्न करतात, त्यांना तिथे आधीपासूनच सत्तास्थानी असलेल्या पुरुषांकडून होणारा विविध पातळ्यांवरील त्रास, त्यांच्या राजकीय अस्तित्वाला गुंडाळून टाकण्याचा प्रयत्न करीत राहतो. महाराष्ट्राने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्क्यांचे आरक्षण दिले खरे, परंतु बहुतेक ठिकाणी निवडून आलेल्या महिलेचा पती हाच निर्णयाचा वहिवाटदार असतो. मोठ्या शहरांमध्ये याला अपवाद असले, तरी बहुतांश ठिकाणी हीच स्थिती दिसून येते. गेल्या शतकाच्या मध्यापासून या देशातील महिलांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. महाराष्ट्रासारख्या राज्यात त्याची एक मोठी चळवळच झाली. समाजाच्या सर्व अंगांना भिडण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी मात्र बराच काळ जावा लागला. महात्मा जोतिबा फुले हे उत्तर प्रदेशातील बहुजन समाज पक्षाचे दैवत असले, तरी प्रत्यक्ष राजकारणात आणि समाजकारणात तेथे महिलांचे स्थान काय आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकताच नाही. शिक्षणाने व्यक्तिमत्त्वात होणारे बदल आणि अंगी येणारा आत्मविश्वास ही या देशातील पुरुषांची डोकेदुखी ठरते, हीच ती पुरुषसत्ताक मनोवृत्ती. कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात महिलांनी गाठलेली उंची जीवनाच्या अन्य प्रांतांत का गाठता आली नाही, याचे कारण होणारा प्रचंड विरोध आणि आपली सत्ता हातून जाण्याची भीती एवढेच असू शकते. उद्योग आणि व्यापाराच्या क्षेत्रात आज देशभरात किती तरी महिला अतिशय महत्त्वाच्या पदांवर काम करताना दिसतात. प्रगतीचा हा निकष दाखवून त्यांना राजकारणात येऊ न देण्याची खेळी जेव्हा खेळली जाते, तेव्हा निर्णय प्रक्रियेपासूनच त्यांना दूर ठेवण्याचा डाव स्पष्ट होतो.

या चारही राज्यांच्या निवडणुकीत महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले, मात्र त्यांचा आवाज प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत क्षीणच राहिलेला दिसतो. मतदार म्हणून या देशातील महिला राजकारणाकडे कशा पाहतात? त्यांना आपण मत देत असलेल्या उमेदवाराबद्दल नेमके काय वाटते? आपले मत आपल्या आयुष्यात काही बदल घडवून आणणारे ठरू शकते का? या प्रश्नांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची आवश्यकता आहे. निवडणुकांचे राजकारण आणि त्यानंतर प्रतिनिधिगृहात होणाऱ्या कामकाजात आपली भूमिका ठामपणे मांडून अपेक्षित हेतू साध्य करण्यासाठीची धडपड, याकडे निवडून आलेल्या महिला प्रतिनिधी कोणत्या नजरेतून पाहतात, याकडेही लक्ष वेधायला हवे. कोणत्याही प्रतिनिधिगृहातील महिलांची संख्याच जर मर्यादित असेल, तर महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रश्न समजून घेऊन त्याकडे सर्वांचे लक्ष वेधणे, हेही अवघडच ठरणारे असते.

या देशातील सामाजिक स्थिती याला कारणीभूत आहे, असे म्हणून हा प्रश्न निश्चितच सुटणारा नाही. त्यासाठी वैचारिक पातळीवर अधिक ठोसपणे भूमिका मांडण्याची गरज आहे. कायदे कितीही महिलांच्या बाजूचे असले, तरी प्रत्यक्ष जगण्यात महिलांना मिळणारे स्थान अधिक उंचावण्यासाठी संपूर्ण समाजाने एकवटून काम करायला हवे… म्हणजे किमान, महिलेच्या उमेदवारीपासूनच तिची वाट अडवण्याचे प्रकार तरी होणार नाहीत. सध्या ते होताहेत, हेच पाच विधानसभांच्या निवडणुकांमुळे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

# याला जबाबदार कोण?

पंतप्रधान, मुख्यमंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक सर्वांना शिव्या द्या परंतु आधी लक्षात घ्या,ते आपण आहोत, जे ₹700 - ₹800 चा ऑक्सिमीटर ₹3,000+ ला विकत आहोत! आपणच ऑक्सिजनचा काळाबाजार करीत आहोत! ते आपण आहोत, जे 20,000+ ला रेमीडेसिविर विकतोय !आपण स्मशानभूमीत सुद्धा बेईमानी करीत आहोत ! नारळ, पाणी, फळे, भाज्या, अंडी, कोंबडी, मसूर, लुटण्यापासून ते इस्पितळात बेड मिळण्यापर्यंत, ज्यांनी लुटले आहे ते सर्व आपणच आहोत ! देशात ज्यांना संधी मिळाली, त्याने लुटले, येथे कोणतीही व्यक्ती केवळ तोपर्यंत प्रामाणिक आहे जोपर्यंत त्याला चोरी करण्याची किंवा लुटण्याची संधी मिळत नाही.किती निर्दोष आहोत ना आपण. डॉक्टरांनी अधिक व्हिटॅमिन सी घेण्यास सांगितल्यानंतर जे लिंबू ₹50 प्रतिकिलोला मिळत होते, ते आता ₹150 प्रतिकिलो दराने विक्रीस येतात. ₹40 चा नारळाचे पाणी ते आता ₹100 ला विकतात. अहो, लोकांनी लॉकडाऊनची बातमी ऐकताच गुटखाची सुध्दा किंमत वाढविली आहे. (जो बॅन देखिल आहे,आणि injurious to health पण)दारू बद्दल तर बोलूच नये, इतका काळाबाजार, आपणच केला आहे ! रूग्णांना ऑक्सिजनची कमतरता आहे असें समजताच, त्यांनी ऑक्सिजनचे ब्लॅक मार्केटिंग सुरू केले. जेंव्हा त्यांना मृत्यूमुखी पडणाऱ्या रूग्णांची दुर्दशा दिसते, तेव्हां तेच रेमेडिसिव्हिर इंजेक्शनचं काळीबाजारी सुरू करतात. लोकांच्या विश्वासाला तडा देत, लोकांनीच इंजेक्शनमध्ये पॅरासिटामॉलची विक्री सुरू केली. जे लोक मृतदेह आणण्याच्या नावाखाली रुग्णवाहिकेच्या 4किमी अंतराला ₹30000+ ची मागणी करण्यास सुरवात करतात. आपण खरोखरच निर्दोष आहोत का?किं गिधाडांसारखे मृतदेहांचे मांस काढत आहोत?मृत्यूनंतर गिधाडे आपले पोट भरण्यासाठी मृतदेहाचे लचके तोडतात, परंतु आपण या घडीला जिवंत मनुष्यांचेच लचके तोडत आहोत, आपली-आपली तिजोरी भरण्याचा प्रयत्न करीत आहोत, एवढी संपत्ती आपण कोणासाठी घेणार किंवा कश्यासाठी? आपण याचा कधी विचार केला आहे ? एकदा तरी विचार केला पाहिजे ... एक दिवस प्रत्येकाला हिशोब द्यावा लागेल ...हिशोब लोकांच्या दरबारात नव्हे तर देवाच्या दारात भरावा लागेल !भारतात कोरोनांन हत्या होत नाहीये, इथं, माणूसच माणसाला आणि माणुसकीला मारतोय. निदान हा मेसेज सर्व दुकानदार, भाजीवाले, फळवाले, डॉक्टर, आक्सीजन विकणारे , व्यापारी यांच्या पर्यन्त पोहचवा त्यातील काहीजण निश्चित बदलतील ,

**एक वाचक**

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
Head Office – Late Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg, Bhaindar (W)
Tal. Dist – Thane - 401101,
Telephone : 28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 25145895 Fax : 28197636

**// Public Works Department //**

**No. MBMC/PWD/Tender/ 18 /2021-22** **Date :- 03 / 05 / 2021**

**// THIRD EXTENSION //**

**Notice No. 07**

Mira Bhayander Municipal Corporation invites Sealed tenders of Works in MBMC Area. In the same tender Notice, the Tender ID No. **675452_1** has been extended **04/05/2021 to 05/05/2021** up to 12.00 pm. This Notice will be available on MBMC's e-Tendering website as https:// mahatenders.gov.in.

**जा क्र./ मनपा/जनसंपर्क/69/2021-22**
**दि. 04/05/2021**

Sign/-
**Executive Engineer (PWD)**
**Mira Bhaindar Municipal Corporation**

## करोना व्यवस्थापनाचं ‘मुंबई मॉडेल’ प्रेरणादायी; नीती आयोगाकडून महापालिकेचं कौतुक

करोनाच्या दुसऱ्या लाटेत सुरुवातीला भयावह परिस्थिती निर्माण झालेल्या मुंबईतील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत असल्याचं चित्र आहे. दुसऱ्या लाटेच्या सुरूवातीला मुंबईत करोना रुग्णसंख्येचा विस्फोट झाल्यानं रुग्णांची बेडसाठी प्रचंड हेळसांड झाली. मात्र, नंतर विविध उपाययोजना करत आणि बेड, रेमडेसिवीर व ऑक्सिजनच्या वाटपात सुसूत्रता आणत मुंबई महापालिकेनं परिस्थिती पकड मिळविण्याचे प्रयत्न केले. महापालिकेच्या करोना व्यवस्थापनाचं सर्वोच्च न्यायालयापाठोपाठ केंद्र सरकारच्या नीती आयोगानेही कौतुक केलं आहे. मुंबईतील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत असल्याचं आशादायक चित्र सध्या तरी दिसत आहे. दुसऱ्या लाटेचा अचानक उद्रेक झाल्यानंतर परिस्थिती बिकट झाली होती. मात्र, महापालिकेकडून तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. त्याचबरोबर रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी बेड, ऑक्सिजन आणि रेमडेसिवीरसंदर्भात समन्वय प्रणाली विकसित करण्यावर भर देण्यात आला. मुंबईच्या ऑक्सिजन वितरण प्रणालीचं सर्वोच्च न्यायालयानेही कौतुक केलं. याची चर्चा सुरू असतानाच केंद्र सरकारच्या नीती आयोगाचे सीईओ अमिताभ कांत यांनीही महापालिका आयुक्तांच कौतुक केलं आहे. “केंद्रीय पद्धतीने बेडचं वाटप करणं, ऑक्सिजन साठवणुकीच्या सुविधांचा अंदाज घेणं, इतकंच नाही तर खासगी रुग्णालयातील बेडचंही वाटप करणं आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी डॅशबोर्ड तयार करणं, रुग्णांच्या तब्येतीबद्दल पाठपुरावा करण्यासाठी वॉर रुम निर्माण करणं. मुंबईचं करोना व्यवस्थापन मॉडेल प्रेरणादायी आहे. मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बाल सिंह चहल आणि त्यांच्या ग्रेट टीमचं अभिनंदन,” अशा शब्दात नीती आयोगाचे सीईओ अमिताभ कांत यांनी मुंबई महापालिका आणि आयुक्तांचं कौतुक केलं आहे.

# एकतर्फी प्रेमातून तरुणीचा विनयभंग

## एकतर्फी प्रेमातून मार्केट यार्ड परिसरातील तरुणीला लग्नासाठी मागणी करून त्रास दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



पुणे, २० हजार लोक आत्ता काय करत आहेत? पाहा एकतर्फी प्रेमातून मार्केट यार्ड परिसरातील तरुणीला लग्नासाठी मागणी करून त्रास दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दुसऱ्यासोबत लग्न केल्यास आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी देऊन पैसे उकळल्याप्रकरणी तरुणाच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. याबाबत २१ वर्षीय तरुणीने तक्रार दिली आहे. त्यानुसार कुतुबुद्दीन हबीब काचवाला (वय २३, रा. कसबा पेठ) याला अटक केली आहे. जून २०१६ ते मे २०१२ दरम्यान ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी काचवाला व तरुणी ओळखीचे आहेत. २०१६ मध्ये ते एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. त्या वेळी काचवाला तरुणीचा सतत पाठलाग करत होता. तिने त्याच्यासोबत संबंध ठेऊ शकत नसल्याचे सांगितले होते. तरीही त्याने पाठलाग सुरूच ठेवला. 'भविष्यात तुला माझ्यासोबतच लग्न करावे लागेल, दुसऱ्यासोबत लग्न केल्यास तुझ्या आई-वडिलांना जीवे मारेल,' अशी धमकी दिली. तरुणीकडे वेळोवेळी पैशांची मागणी केली. तिच्याकडून रोख चाळीस हजार रुपये, एक तोळ्याची अंगठी घेतली; तसेच अनेकदा तिचा

# वांगणीतील 99 टक्के फुफ्फुस संसर्ग झालेल्या रुग्णाला दोन दिवसात बरे केल्याचा दावा, डॉक्टरवर गुन्हा दाखल



कल्याण : अंबरनाथ तालुक्यातील बदलापूर नजीक असलेल्या वांगणी येथे शिला क्लिनिक ह्या खाजगी दवाखान्याच्या डॉ. उमाशंकर गुप्ता आणि त्यांच्या महिला सहकारी डॉक्टरवर बदलापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. गुप्ता यांनी कोरोनाबाधित रुणाला एका दिवसात बरं करण्याचा दावा करत समाज माध्यमावर एक व्हिडीओ व्हायरल केला होता. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्या क्लिनिकमध्ये रुणांची गर्दी होत होती. त्यांच्या उपचार पद्धतीवर तज्ज्ञ डॉक्टरांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. हा सर्व प्रकार एबीपी माझाने प्रकाश झोतात आणला होता. अखेर या संपूर्ण प्रकाराची दखल आरोग्य विभागाने घेतलीय. डॉ गुप्ता यांनी कोरोना रुणांवर उपचार करण्यासाठी जिल्हा परिषद आणि आरोग्य विभाग ठाणे यांची कोणतीही परवानगी नसताना वांगणी येथे आपले क्लिनीक थाटले होते. तसेच कोरोना काळात कोणतेही नियम न पाळता, मास्क न लावता, सुरक्षिततेची कोणतीही काळजी न घेत नसल्याचा ठपका ठेवत अखेर ह्या डॉक्टरवर बदलापूर ग्रामीण पोलिसांनी अंबरनाथचे डॉ. सुनील बनसोडे यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल केला आहे. मात्र अद्याप त्यांना अटक केली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# सावत्र आई-बापावर कोंढव्यात गुन्हे दाखल



पुणे, सावत्र आई-वडिलांकडून मुलांचा सांभाळ न करता, त्यांचा छळ केल्याच्या आरोपावरून दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका सामाजिक संस्थेला हा प्रकार समजल्यानंतर त्यांनी खात्री करून कोंढवा पोलिसांकडे तक्रार दिली. याबाबत 'ज्ञानदेवी चाइल्ड लाइन' संस्थेच्या अपर्णा मकरंद मोडक (वय ४६, रा. भारती विद्यापीठ) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार सलीम शेख व मुलाची सावत्र आई शाहीन सलीम शेख (रा. कोंढवा खुर्द) यांच्यावर 'जुवेनाइल जस्टीस ॲक्ट'नुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सलीम व शाहीन त्यांच्या आठ वर्षाच्या मुलीचा सांभाळ व्यवस्थित न करता तिला मारहाण करत होते. शाहीन मुलीची सावत्र आई असून, ती मुलीला वेळेवर जेवण न देता शिवीगाळ करून त्रास देत होती. याबाबत तक्रारदार यांच्या सामाजिक संस्थेला माहिती मिळाली. त्यानुसार खात्री करून त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

दुसऱ्या घटनेत 'ज्ञानदेवी चाइल्ड'च्या सविता दिवटे (वय ४८, रा. औंध) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार मुलीचे सावत्र वडील आहिल खान (रा. कोंढवा) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाथाबुक्क्यांनी मुलीला मारहाण आहिल खान त्याच्या १३ वर्षांच्या सावत्र मुलीचा व्यवस्थित सांभाळ करत नव्हता. तिला किरकोळ कारणावरून पाठीत फळीने मारहाण करत होता. गेल्या सहा महिन्यांपासून सतत शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत होता. तिला जेवणही व्यवस्थित देत नव्हता. याबाबत सामाजिक संस्थेने खात्री करून पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दिली आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

# अंमली पदार्थांची अवाक पुन्हा वाढली



मुंबई, पहिल्या लॉकडाउनमुळे मुंबईत थांबलेली ड्रग्जची आवक पुन्हा वाढल्याचे दिसून येत आहे. मुंबई पोलिस आणि गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे ही बाब समोर आली आहे. आठवड्याभरात पोलिसांनी लाखो रुपयांचे कोकेन, एमडी, गांजा, अफिम यांसारखे अंमली पदार्थ जप्त करून अनेकांची धरपकड केली आहे. मुंबई पोलिस, गुन्हे शाखा, तसेच अंमली पदार्थविरोधी पथकाच्या वतीने मुंबईत ड्रग्जची तस्करी, विक्री, तसेच सेवन करणाऱ्यांवर बारीक नजर ठेवली जात आहे. राज्यात कडक निर्बंध असले तरी छुप्या मार्गाने अंमली पदार्थ येण्याचे प्रकार सुरूच आहेत. अंमली पदार्थविरोधी पथकाच्या कांदिवली युनिटचे प्रभारी पोलिस निरीक्षक रुपेश नाईक यांच्या पथकाने गोरेगाव येथील पशू कॉलेजच्या समोरून एका २० वर्षांच्या तरुणाला ताब्यात घेतले. अंगझडतीमध्ये त्याच्याकडे १० लाखांचे कोकेन आणि सुमारे १२ लाखांचे एमडी ड्रग्ज सापडले. नवी मुंबई येथे राहणाऱ्या एका नायजेरियन तरुणाकडून हे ड्रग्ज खरेदी केल्याची माहिती त्याने दिली. भायखळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक खोत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक श्यामराव पाटील, उपनिरीक्षक शशिकांत ढाणे यांनी माझगाव परिसरात नशेबाजांविरुद्ध कोम्बिंग ऑपरेशन हाती घेतले. त्यामध्ये सोनाराम बिष्णोई ऊर्फ सुनील याच्याकडून एक किलो अफिम हस्तगत करण्यात आले. आझाद मैदान येथील अंमली पदार्थविरोधी पथकाचे पोलिस हवालदार नाईक यांना वरळी परिसरात एका व्यक्तीकडे मोठा प्रमाणात गांजाचा साठा असल्याची माहिती मिळाली. प्रभारी पोलिस निरीक्षक राजेंद्र दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरळी दूध डेअरी वसाहतीजवळ छापा टाकून शिवकुमार बसय्या याला अटक केली. शिवकुमारकडे असलेल्या गोणीमध्ये सुमारे ४० किलो गांजा सापडला.

# एकतर्फी प्रेमातून तरुणीचा छळ, कंटाळून शेवटी तिनं...



पुणे, एकतर्फी प्रेमातून मार्केटयार्ड परिसरातील तरुणीला लग्नासाठी मागणी करून त्रास दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तसेच, दुसऱ्यासोबत लग्न केल्यास आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी देत पैसे उकळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी तरुणाच्या विरोधात मार्केटयार्ड पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली आहे.

याबाबत २१ वर्षीय तरुणीने तक्रार दिली आहे. त्यानुसार कुतुबुद्दीन हबीब काचवाला (वय २३, रा. कसबा पेठ) याच्या विरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. जून २०१६ ते मे २०१२ दरम्यान ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी काचवाला व तरुणी ओळखीचे आहेत. २०१६ मध्ये ते एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. त्यामुळे त्यांची ओळख होती. त्यावेळी काचवाला हा तरुणीचा सतत पाठलाग करत होता. त्यावेळी देखील तिने त्याच्यासोबत संबंध ठेवू शकत नसल्याचे सांगितले होते. तरीही त्याने तिचा पाठलाग सुरूच ठेवला. भविष्यात तुला माझ्यासोबतच लग्न करावे लागेल, दुसऱ्या सोबत लग्न केल्यास तुझ्या आई-वडिलांना जीवे मारेन,अशी धमकी दिली. तरुणीकडे वेळोवेळी पैशाची मागणी केली. तिच्याकडून रोख चाळीस हजार रुपये, एक तोळ्याची सोन्याची अंगठी घेतली.

# लॉकडाउनमध्ये गुन्हेगार सुसाट



पुणे : गेल्या महिन्याभरात शहरात लॉकडाउन आणि संचारबंदी असतानाही गुन्हेगार मात्र मोकाट आहेत. या महिनाभराच्या संचारबंदीच्या काळात १३ खून, २२ खुनाचे प्रयत्न, २० घरफोड्या आणि २१ जबरी चोरीचे गुन्हे घडले आहेत. त्यामुळे संचारबंदीतील 'पोलिसिंग'वरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शहरात तीन एप्रिलपासून सायंकाळी सहा ते सकाळी सहा या वेळेत संचारबंदी लागू करण्यात आली होती. तर, १५ एप्रिलपासून शहरात लॉकडाउनप्रमाणे निर्बंध अधिक कडक करण्यात आले; तसेच रात्रीसह दिवसादेखील संचारबंदी लागू करण्यात आली. हे निर्बंध लागू करून आता महिना उलटून गेला आहे. गेल्या वर्षातील संचारबंदीशी तुलना करता, गेल्या महिन्याभरात रस्त्यावरील वर्दळ पाहून शहरात खरोखरंच संचारबंदी आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. तोच प्रश्न शहरात गेल्या महिनाभरात घडलेल्या गुन्ह्यांवरूनही उपस्थित होत आहे. शहरातील पोलिस ठाण्यांत या महिनाभरात ४७३ हून अधिक गुन्हे दाखल आहेत. त्यात खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोडा, घरफोडी, गर्दी जमवून मारामारी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची संख्या २६८ इतकी आहे. गेल्या महिनाभरापासून शहरात नाकाबंदीसाठी बॅरिकेडींग करण्यात आले आहे. मात्र, ही नाकाबंदी केवळ नावालाच होती. त्यामुळे अनेकांचा मुक्त संचार सुरूच होता. पुण्यातील लॉकडाउनबाबत हायकोर्टाने दखल घेतल्यानंतर पोलिसांकडून निष्कारण फिरणाऱ्यांची तपासणी आणि त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. रस्त्यावर नाकाबंदी; तरीही वाहनांची चोरी गेला महिनाभर शहरातील प्रमुख रस्त्यांवर नाकाबंदी करण्यात आली आहे. मात्र, या दरम्यान पोलिसांना वाहनचोरांना अटकाव करता आलेला नाही. शहरात तीन एप्रिल ते सात मे या कालावधीत चोरीच्या एकूण ९८ घटना घडल्या. त्यामध्ये वाहनचोरीचे प्रमाण सर्वाधिक आहे. पोलिस रस्त्यावर असतानाही वाहनचोरांनी त्यांच्या नाकावर टिच्चून वाहने चोरून नेली. रस्त्यावर वर्दळ तुलनेने कमी असल्याने काही चोरांनी थेट निवासी इमारतीच्या पार्किंगमधून वाहने चोरली आहेत. टोळक्यांचा धुडगूस कायम शहरात रस्तोरस्ती भांडणे, हाणामाऱ्या आणि स्थानिक टोळक्यांकडून निर्माण केली जाणारी दहशत असे प्रकार दररोज घडत होते. संचारबंदी काळात गर्दी जमवून मारामारी आणि दुखापत केल्याचे एकूण ९३ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये १९ गुन्हे टोळक्यांनी एकत्र येऊन केले आहेत. त्यामुळे रस्तोरस्तीच्या गुंडांवर या संचारबंदीत पोलिसांना जराही अंकुश ठेवता आला नसल्याचे दिसून येते.

# रेडमेसिवीर काळाबाजार-नेवासा तालुक्यात दोघांना पकडले बाकी फरार



अहमदनगर: अंमलीपदार्थांची जशी लपून छपून साखळी पद्धतीने विक्री केली जाते, तसाच काहीसा प्रकार रेमडेसिवीर इंजेक्शनच्या बाबतीत सुरू असल्याचे आढळून आलं आहे. केवळ शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातही हे प्रकार सुरू झाले आहेत. नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी नेवासा तालुक्यात दोघांना पकडले आणि तेथून साखळीच उलगडत गेली. आतापर्यंत चौघे पोलिसांच्या हाती लागले आहेत, एक जण फरारी असून मुख्य सूत्रधाराचा ठावठिकाणी अद्याप बाकी आहे. काळाबाजार थोपविण्यासाठी नियम कडक करून सध्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आणि केवळ रुग्णालयांत या इंजेक्शनचा पुरवठा होत असताना ती बाहेर येतातच कशी? हा प्रश्नही अद्याप अनुत्तरीत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आज सकाळपासून धावपळ करीत ही कारवाई केली आहे. आतापर्यंत चार आरोपी हाती लागले असून त्यांच्याकडून सहा इंजेक्शनसह ११ लाख, ७० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल कटके यांना माहिती मिळाली की, नेवासा तालुक्यात काही जण या इंजेक्शनची चढ्या भावाने विक्री करीत आहेत. त्यानुसार त्यांनी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी अशोक राठोड आणि आपल्या पथकाला घेऊन सापळा रचला. बनावट ग्राहकामार्फत संशयितांशी संपर्क साधला. त्यांनी ग्राहकाला नगर-औरंगाबाद रोडवरील एका हॉटेलसमोर यायला सांगितले. त्यानुसार बनावट ग्राहक आणि पोलिसांनी तेथे जाऊन सापळा रचला. एका इंजेक्शनची किंमत आरोपींनी ३५ हजार रुपये सांगितले होती. ते घेण्याची तयारी दर्शविताच आरोपी समोर आले. रामहरी बाळासाहेब घोडेचोर (वय २२ रा. देसवडे, ता. नेवासा) व आनंद कुंजाराम धोटे (वय २८, रा. भातकुडगांव, ता. शेवगाव) यांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून दोन इंजेक्शन हस्तगत करण्यात आली. चौकशीत त्यांनी ही पंकज खरड (रा. देवटाकळी, ता. शेवगाव) याच्याकडून घेतल्याचे सांगितले. पोलिसांनी तातडीने खरड याचा शोध घेऊन त्याला पकडले. त्याच्याकडेही एक इंजेक्शन आढळून आले. त्याच्याकडील चौकशीत त्याने हे इंजेक्शन सागर तुकाराम हंडे (वय ३०, रा. खरवंडी, ता. नेवासा) याच्याकडून आणल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी लगेच हंडे याचा शोध सुरू केला. तो वडाळा बहिरोबा गावात बसस्थानकाजवळ आढळून आला. त्यालाही पकडण्यात आले. त्याच्याकडून दोन इंजेक्शन आढळून आली. त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने ती हेमंत राकेश मंडल (रा. वडाळा, ता. नेवास) याने विक्रीसाठी दिल्याचे सांगितले. त्याच्याकडे आणखी साठा असून तो ती आपल्या कारच्या डॅशबोर्डमध्ये ठेवतो अशी माहितीही हंडे याने पोलिसांना दिली. आता पोलिसांना मंडल हवा होता. त्यामुळे पोलिसांनी हंडे यालाच त्याच्याच मोबाइलवरून मंडल याला फोन करण्यास सांगितले. त्यावर त्याने आपण नेवासा फाटा येथे असल्याचे सांगितले. पोलिसांनी तातडीने तिकडे धाव घेतली. त्याचा शोध घेतला. मात्र, तो आढळून आला नाही. मात्र, तेथील राजमुद्रा चौकात त्याची कार उभी होती. हंडे याने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी कारची झडती घेतली असता डॅशबोर्डमध्ये रेमडेसिवीर इंजेक्शन आढळून आले. यातील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडील इंजेक्शन, वाहने आणि मोबाईलही अशा सर्व मिळून ११ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी मंडल हाती लागला नाही. त्यामुळे त्याच्याकडे इंजेक्शन कोठून आली, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. औषध निरीक्षक राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शनिशिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरारी आरोपीचा शोध सुरू आहे. पोलिस अधीक्षक मनोज पाटील, अतिरिक्त अधीक्षक सौरभ अग्रवाल, डीवायएसपी सुदर्शन मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल कटके यांनी आपल्या पथकासह ही मोहीम राबविली. सोमनाथ दिवटे, मिथून घुगे, गणेश इंगळे, सुरेश माळी, प्रकाश वाघ, शंकर चौधरी, संतोष लोढे, लक्ष्मण खोकले, दिपक शिंदे, रवींद्र घुगासे, संदीप पवार, मेघराज कोल्हे, योगेश सातपूते, उमाकांत गावडे या पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा पथकात समावेश होता.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898